## जिल्हाधिकारी कार्यालय सातारा (पुरवठा शाखा)

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत संगणकीय प्रणालीमधील शिधापत्रिका संगणकीकरण व पुरवठा विषयक बाबतची डेटा एंट्री करणेकामी निविदा सुचना

क्रमांकः-पुशा/स्वधादु२/कावि ४३७ /१२
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा( पुरवठा शाखा )
दिनांक :-०२/०१/२०१२

जिल्हाधिकारी कार्यालय सातारा (पुरवठा शाखा) या कार्यालयाकडून सातारा जिल्हयातील सार्वजनीक वितरण व्यवस्थे अंतर्गत प्रणालीमधील शिधापत्रिकांचे संगणकीकरण करणे व इतर पुरवठा विषयक बाबींचे Online डेटा एंट्रीचे काम करावयाचे आहे. वरील नमुद केलेल्या प्रणालीमधील शिधापत्रिकांचे संगणकीकरण व पुरवठा विषयक बाबींचे डेटा एंट्रीचे कामाबाबत अशासकीय संस्थांकडुन मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. अशासकीय संस्थेकडुन मोहरबंद लिफाफयात स्पर्धात्मक निविदा तीन लिफाफा पध्दतीत मागविणेत येत आहेत. निविदा फॉर्म विक्री जिल्हाधिकारी कार्यालय सातारा (पुरवठा शाखा) येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. तसेच निविदेच्या अटी व शर्ती सातारा जिल्हयाच्या www.satara.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत.

### कार्यवाहीचे टप्पे

| अ.क्र | कार्यवाही चे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | निविदा फार्म विक्री करणे | ०४/०१/२०१२ ते १२/०१/२०१२<br>(कार्यालयीन कामकाजा दिवशी कार्यालयीन वेळेत) |
| २ | निविदा सादर करण्यांचा अंतिम दिनांक | १३/०१/२०१२ दुपारी ३:०० वाजे पर्यत<br>(मुदती नंतरचे फार्म स्वीकारले जाणार नाही) |
| ३ | निवीदा उघडणे | १३/०१/२०१२ दुपारी ४:०० वाजता (जिल्हाधिकारी हे निवीदाकार किंवा त्याचे प्रतिनिधी यांचे समोर निवीदा उघडतील ) |

**निविदेबाबतच्या अटी व शर्ती निविदा फॉर्मसोबत पुरविणेत येतील.**

**जिल्हाधिकारी सातारा**

**<u>सातारा जिल्हयातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ऑनलाईन संगणकीय शिधापत्रिका डेटा एंट्रीचे निविदा बाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे</u>**

**निविदा सुचनेत नमुद केले प्रमाणे सिलबंद निविदा तिन लिफाफे निविदा पध्दतीत खालील प्रमाणे सादर करावेत.**

**लिफाफा क्रमांकः- १(अ)**

यात फक्त EMD रक्कमेचा डी.डी. चा समावेश आहे.

**लिफाफा क्रमांकः- २(ब)**

**यात प्रपत्र क्रमांक २ व खालील वादी संबंधाने आवश्यक कागदपत्रे अंतर्भुत करावेत.**

१. संस्थेच्या नोंदणीचे प्रमाणपत्र.

२.Income Tax Clearance Certificate

३.संगणक क्षेत्रात विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयात काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र.

४.संस्थेची profile व तांत्रिक मनुष्यबळ उपलब्धता व उपलब्ध मनुष्यबळाची शैक्षणीक अर्हता बाबत सविस्तर माहिती.

**लिफाफा क्रमांकः-३ (क)**

**यात फक्त दर पत्रकाचा (प्रपत्र क्रमांक ३) समावेश असावा.**

**१. निविदा निश्चित करण्याची कार्यपध्दती :**

शासन निर्णयानुसार त्रि लिफाफा पध्दतीचा अवलंब करण्यात येईल व या शासन निर्णयातील तरतुदीचे व खालील बाबीचे काटेकोर पालन करावे लागेल . मा.प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील अ.शा.पत्र क्रमांक.सीव्हीसी २०११/प्रक्र.११७/नापु-२६ दिनांकः-१७ नोव्हेंबर, २०११ अन्वये दिल्ली/मुंबई यांनी तयार केलेल्या CAS ( Common Application Software) या आज्ञावलीमध्ये शिधापत्रिकांची Online Data entry करणे.

**( अ )** तीन / त्रि लिफाफ्यापैकी लिफाफा **अ- अनामत रक्कमेचा डीडी , ब <u>-तांत्रिक लिफाफा</u>** आणि **<u>क- संगणक दराचा लिफाफा</u>** राहील. तांत्रिक लिफाफ्यावर **ब-तांत्रिक लिफाफा** आणि संगणक दराच्या लिफाफ्यावर **क संगणक दर** असे स्पष्ट नमुद करावे. सदर तिन्ही लिफाफे स्वतंत्र लिफाफ्यात मोहरबंद करण्यात यावेत. **अ लिफाफा व ब तांत्रिक लिफाफ्यात** मागविण्यात आलेल्या सर्व कागदपत्राची व निवीदेतिल सर्व अटी व शर्तीची पुर्तता करण्याऱ्या निविदाकाराच्या बाबतील दराचा लिफाफा (क) उघडण्यात येईल.

(ब) तांत्रीक लिफाफ्यातील कागदपत्राची पुर्तता निविदा अर्ज सादर करतांना पुर्ण करण्यात यावी. तांत्रीक लिफाफा उघडल्यानंतर ऐनवेळी कोणतेही कागदपत्र स्विकारले जाणार नाही. तांत्रीक लिफाफ्यातील कागदपत्रात अटी व शर्तीत नमुद केलेल्या अर्हतापेक्षा कमी अर्हता आढळल्यास निविदा अपात्र ठरतील.

(क) दराच्या लिफाफ्यात ( लिफाफा - क ) मध्ये फक्त दर नमुद करण्यात यावे. दराची छायाप्रत ग्राहय धरण्यात येणार नाही.

(ड) निविदे सोबत किंवा निविदे मध्ये कोणतीही अट किंवा पर्याय देता येणार नाही. असे झाल्यास सदर निविदा विचारात घेतली जाणार नाही.

(इ) निविदेचा तांत्रीक लिफाफा उघडल्यानंतर ३ पेक्षा कमी पात्र निविदा प्राप्त झाल्या असतिल तर संगणक दराचा लिफाफा न उघडता अल्प प्रतिसादामुळे (फेर निवीदा न काढता ) निविदेस १५ दिवसाची मुदतवाढ देण्यात येईल. त्यामध्येही ३ ग्राहय निविदा प्राप्त न झाल्यास दुसऱ्यांदा पुन्हा १५ दिवसाची मुदतवाढ देण्यात येईल व त्यानंतरही ३ पेक्षा कमी ग्राहय निवीदा प्राप्त झाल्यास त्यानंतरची कार्यवाही , वरिष्ठ अधिकारी यांचे समोर ( जिल्हाधिकारी ) निविदादाराचा लिफाफा उघडण्यात येईल.

(फ) शिधापत्रिका संगणकीकरण डेटा एंट्रीचे काम संबंधित तालुकेचे ठिकाणी करण्यात येवून केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या CAS ( Common Application Software) या आज्ञावलीमध्ये शिधापत्रिकांची Online Data entry करावयोचे आहे.

## २ वाटाघाटी करण्याच्या पध्दती :

निविदेव्दारे कंत्राटदाराची नियुक्ती करतांना सामान्यतः निविदा सुचनेस वर्तमानपत्रामध्ये योग्य प्रकारे व्यापक प्रसिध्दी देवुन निविदांना चांगला प्रतिसाद मिळाला असेल व निविदा पुरेशा स्पर्धात्मक झाल्याची खात्री पटल्यानंतर वैध ठरणाऱ्या निविदेतील न्युनतम दराच्या निविदा स्विकारल्यानंतर निविदेव्दारे प्राप्त झालेले दर योग्य / वाजवी वाटत नसतील तर तशी कारणे लेखी स्वरुपात नमुद करुन न्युनतम दर देणाऱ्या निविदाकारासोबत वाटाघाटी करुन कंत्राट निश्चित करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत न्युनतम दर देणाऱ्या निविदाकाराव्यतीरिक्त इतर कोणाशीही वाटाघाटी करण्यात येणार नाही. न्युनतम दर देणाऱ्या निविदाराबरोबर वाटाघाटी केल्यानंतरसुध्दा प्राप्त झालेले दर योग्य/वाजवी नसतील तर फेर निविदा काढण्यात येतील. ज्या प्रकरणी निविदाकारांनी साखळी केल्याची शंका येईल, त्या प्रकरणी मा. जिल्हाधिकारी मुळतः निविदा सादर न केलेल्या त्यांच्या माहितीतल्या एखद्या अनुभवी व पात्र निविदाकाराचा समावेश करु शकतील. वाटाघाटी करण्यापूर्वी निविदाकारांना हे स्पष्ट करण्यात येईल की, वाटाघाटी या निविदाकार कोणत्या मर्यादेपर्यंत दर कमी करण्यास तयार आहेत याची तपासणी करण्यासाठी घेण्यात येईल. मात्र, वाटाघाटी केल्यानंतर सुध्दा निविदाकारांनी त्यांच्या मुळ निविदेत वा वाटाघाटी दरम्यान केव्हाही देवु केलेल्या, कोणत्याही दराचा देकार स्विकारण्याचा पर्याया शासनास उपलब्ध राहील.

तथापि, आवश्यकतेनुसार न्युनत्तम निविदाकाराशी व तो तयार नसल्यास आपत्कालीन परिस्थिती दुसऱ्या न्युनत्तम निविदाकाराशी वाटाघाटी करुन कमीत कमी दर मंजूर करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांना राहतील.

## ३ जिल्हयासाठी एकच निविदा

संगणकीय प्रणालीमधील शिधापत्रिका डेटा एंट्रीचे कामाबाबतचे कंत्राट निश्चित करण्यासाठी गावनिहाय निविदा न मागविता **जिल्हयासाठी एकच निविदा राहील**. सातारा तालुक्‍यची पथदर्शी प्रकल्प राबविणेकामी शासन स्तरावर निवड झाल्याने प्रथमतः सातारा तालुकयाचे शिधापत्रिका डेटा एंट्रीचे काम सुरू करण्यात येईल.

## ४ कंत्राट निश्चित करण्याचे अधिकार

संगणकीय प्रणालीमधील शिधापत्रिका डेटा एंट्रीचे कामाबाबतचे कंत्राट खुल्या निवीदा पध्दतीव्दारे निश्चित करण्यासाठी **जिल्हाधिकारी सातारा हे सक्षम प्राधिकारी आहेत.**

(अ) सक्षम प्राधिकारी न्युनतम निविदाकराबरोबर वाटाघाटी करतील.

५ संगणक निवीदा फॉर्मची किमत रुपये १०००/- ( अक्षरी रुपये एक हजार मात्र ) असुन सदर फॉर्मची रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट जिल्हाधिकारी सातारा यांचे नावाचा जमा करावे लागेल त्याशिवाय निविदा फॉर्म मिळणार नाही.

६ **शासकीय संगणकीय कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र** :- निविदाकारास केंद्रीय,वा राज्य शासकीय,वा निमशासकिय संस्थेच्या साफटवेअरचे किंमान दोन वर्षाचा अनुभव असावा त्या बाबतचे प्रमाणपत्र निवीदे सोबत सादर करणे आवश्यक आहे . खाजगी व्यक्ती कडील कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र विचारात घेण्यात येणार नाही .

7 **प्रतिभुती ठेव रक्कम** : प्रतिभुती ठेवीची रक्कम रुपये १०००० /- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र ) राहील . तसेच काम अपुर्ण सोडून दिल्यास अथवा असमाधानकारक आढळल्यास प्रतिभुृतीची रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल

8 **आयकर कपात** :- आयकर अधिनियम १९६१ च्या कलम १९४ (सी) ची तरतुद लागु होते या संदर्भात वितीय सल्लागार व उप सचीव यांनी त्यांच्या कडील परिपत्रक क्र. १/३९८/७९२२ दिनांक ०९/१२/१९९६ अन्वये देयकातुन केद्र शासनाचा प्रचलित नियमानुसार व वेळो-वेळी बदल्यानुसार आयकर कपात करण्यात येईल.

9 कोणतीही निवीदा संपुर्ण अथवा अंशतः मंजुर करण्याचा किंवा कोणतेही कारण न दाखवता नामंजुर करण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. यासंबधी जिल्हाधिकारी सातारा यांचा निर्णय अंतीम राहील व सर्व निवीदा धारकांना बंधनकारक राहील.

10 मान्य करण्यात आलेल्या निविदाधारकास करारानामे १०० रुपयाच्या बाँड पेपर करुन देणे बंधनकारक राहील.

11 करारनामा करण्यात आल्यानंतर डेटा एंट्ीचे काम तात्काळ सुरु करणे बंधनकारक राहील.

12 सदर डाटा एंट्रीचे काम करताना पुरेशे संगणक इंटरनेटच्या सुविधेसह निविदाकारानी पुरविणे आवश्यक आहे.तसेच तात्काळ कामाची निकड लक्षात घेता जास्तित जास्त संगणक व ऑपरेटर पुरविणेची क्षमता निविदा धारकाकडे असणे आवश्यक आहे.

13 सदर डाटा एंट्रीचे काम करारनाम्यानंतर कमाल तीन महिन्यात पूर्ण करणे आवश्यक आहे.

१४ **मंजूर निविदाकाराने करारनामा न केल्यास त्याबाबत करावयाची कार्यवाही** :

अ) मंजूर निविदाधारकास निविदा मंजूरीनंतर ४ दिवसाचे आत सर्व कागदपत्राची पुर्तता करुन रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यात करारनामा करणे बंधनकारक आहे.

ब) मंजुर निविदाकाराने करारनामा न केल्यास अथवा करारनामा करण्यास नकार दिल्यास लगतच्या न्युनतम निविदाकारास ऑनलाईन शिधापत्रिका डाटा एंट्रीचे कंत्राट देवुन शासनास जादा खर्च करावा लागणाऱ्या फरकाची वसुल करावयाची रक्कम दोषी निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.तथापि काही तांत्रीक कारणास्तव प्रथम न्युनत्तम निविदाधारक करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास व विहित मुदतीनंतर न्युनत्तम निविदाकार करारनामा करण्यास तयार असल्यास अशा निविदाकाराशी करारनामा करण्यात येईल.

क) मंजूर निविदाकार करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास लगतच्या न्युनत्तम निविदाकाराची निविदा शासन निर्णया प्रमाणे निश्चित करण्यात येईल . मात्र, लगतचा न्युनत्तम निविदाकरा करारनामा करण्यास तयार नसल्यास निविदा प्रक्रीया रद्द करून फेरनिविदा बोलविण्यात येतील. अशा फेरनिविदा प्रक्रियेत पहिल्या निविदेत करारनामा करण्यास नकार देणाऱ्या प्रथम न्यूनत्तम निविदाकारास प्रतिबंधित करण्यात येईल.

ड) करारनामा करण्यास नकार देणारा निविदाकार हा निविदा सादर केल्यानंतर करारनाम्यातील तरतूदींना बांधील आहे. त्यामुळे, लगतच्या न्युनत्तम निविदाकराची निविदा मंजूर केल्यामुळे शासनाने वसुल करावयाची अतिरिक्त रक्कम, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या **पी.एल.आर. अधिक दोन टक्के** (Prime Lending Rate) व्याजासह करारनामा न केलेल्या निविदाकराकडून वसूल करण्यात येईल. सदर वसुली जमीन महसुलीच्या थकबाकीची वसुली म्हणुन करण्यात येईल.

**१५. कसूरदार कंत्राटदारा विरुध्द करावयाची कारवाई :** कंत्राटदाराची नियुक्ती केल्यानंतर, जर कंत्राटदार संगणकाचे काम करण्यास अयशस्वी ठरला तर प्रसंगानुरुप पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल

| | |
|---|---|
| अ | मुळ नियुक्त कंत्राटदाराच्या नंतर लगतचे उच्च दर देणाऱ्यास दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाकारास त्यांने दिलेल्या दरापेक्षा जास्त नाहीत अशा दराने संगणक कामासाठी नियुक्त करण्यात येईल. |
| ब | जर अ.क्र. अ येथे नमुद केलेली कार्यवाही सदरहू दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाकाराच्या अनिच्छेमुळे किंवा अन्य कारणामुहे शक्य नसेल, वा जिल्हाधिकारी सातारा यांना ती शक्य वाटत नसेल, तर त्याबाबतची कारणे लेखी स्वरुपात नमूद करुन अन्य कोणत्याही निविदाकारास त्यांनी निविदेत देवू केलेल्या दरानुसार प्राथम्य ठरवून, त्यानुसार त्यांनी दिलेलया दराच्या अधीन राहून काम सोपविता येईल, |
| क | वरील दोन्ही बाबी शक्य नसल्यास, उपलब्ध कंत्राटदारांमधून मर्यादित स्वरुपात निविदा मागवून काम सोपविता येईल, |

**१६** निविदेतील सुचना बाबत काही शंका असल्यास निविदा सादर करण्यापुर्वी प्रत्यक्ष कार्यालयात येवुन शंकेचे निरसन करुन घ्यावे. ऐनवेळी कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. तसेच करारनामा करतांना सविस्तर पत्ता व फोन नंबर, भ्रमणध्वनी नंबर देणे आवश्यक आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय पुरवठा विभाग सातारा येथे संपर्क ठेवणे आवश्यक आहे.

**१७** सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत संगणकीय प्रणालीमधील शिधापत्रिका डेटा एंट्रीचे कामासाठी  देयकाच्या १००% रक्कमेचे प्रदान काम पूर्ण झाल्यावर  देणेत येईल.

**सातारा**

दिनांक **जिल्हाधिकारी सातारा**